तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६१२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in

अत्यंत महत्त्वाचे/कालमर्यादित

क्रमांक : १०/एडीएम/पदविका/२०१२/४६२
दिनांक : 30 JUN 2012

प्रति,
मा. सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधील सर्व प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, इ. पदविका अभ्यासक्रमाच्या अल्पसंख्याक संस्थांच्या व विनाअनुदानित संस्थांच्या जागा केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेसाठी समर्पित करणेबाबत

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी सर्व प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, इ. पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया सुरु होत आहेत. संचालनालयाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या प्रवेश प्रक्रियेसाठी अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असलेल्या संस्था तसेच खाजगी विनाअनुदानित संस्था अनुक्रमे अल्पसंख्याक कोटयातील तसेच संस्थास्तरावरील जागा केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे भरण्यासाठी शासनाकडे समर्पित करतात.

या संदर्भात कळविण्यात येते की, खाजगी विनाअनुदानित संस्थांना २० टक्के संस्थास्तरावरील जागा असतात. त्या २० टक्के जागांपैकी किती टक्के जागा संबंधित संस्था भरणार आहे याची माहिती संस्थेच्या संकेतांक (Institute Code) चा उपयोग करुन Log In केल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रम आणि विषयनिहाय जागांची टक्केवारी ऑनलाईन नमूद करावयाची आहे. त्यानुसार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये उपलब्ध होणाऱ्या जागा विद्यार्थ्यांना दर्शविण्यात येतील.

त्याचप्रमाणे अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असलेल्या विनाअनुदानित संस्थांना त्यांच्यामार्फत चालविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाच्या विषयनिहाय एकूण जागांपैकी २० टक्के संस्थास्तरावरील जागांव्यतिरिक्त उर्वरित जागांपैकी किती टक्के जागा अल्पसंख्यांक कोटयातून भरावयाच्या आहेत याची माहिती संस्थास्तरावरील कोटयातील जागांप्रमाणेच ऑनलाईन भरावयाची आहे. मात्र असे करताना अल्पसंख्याक विकास विभागाने अल्पसंख्यांक कोटयातील जागा भरण्याबाबत दिलेल्या निदेशांचे पालन संबंधित संस्थांनी करणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.

तसेच, वरील विषयाच्या अनुषंगाने ज्या संस्थांनी संचालनालयाकडे पत्र सादर करुन समर्पित जागा केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमार्फत भरण्यासाठी माहिती दिलेली आहे, अशा संस्थांनीही ती माहिती ऑनलाईन भरणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

खाजगी विनाअनुदानित संस्थांना त्यांच्या संस्थास्तरावरील तसेच अल्पसंख्याक संस्थांच्या बाबत संस्थास्तरावरील आणि अल्पसंख्याक कोटयामधील जागांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर भरण्यासाठी दिनांक ०३/०७/२०१२ पर्यंत मुदत देण्यात येत आहे. या मुदतीत संस्थांनी जागा संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपडेट कराव्यात असे आपल्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात यावे. ज्या संस्था वरील माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपडेट करणार नाहीत अशा अल्पसंख्याक संस्थांच्या एकूण मंजूर प्रवेश क्षमतेच्या २९ टक्के जागा केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेसाठी घेण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई.

\\192.168.1.9\minister_ppt\desk-10\letters\cap 2010-11\Letter mis.doc 38

अतितात्काळ

क्र. तंशिस/प्राकाना/औति/आस/2012/1800
दि. 01/07/2012.

प्रति,
प्राचार्य सर्व विनाअनुदानित अभि./औषधनिर्माणशास्त्र/हॉमॅ.कॅटे संस्था,
यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार कालमर्यादित तात्काळ कार्यवाही करावी.

सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रा.का.नागपूर